क्रमांक :जमीन-२६९०/११८४/प्र.क्र.२८५५/ज-३.
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १९ डिसेंबर, १९९४

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कांदिवली स.नं.१४६/न.भू.क्र.१२४ व स.नं.१४७ न.भू.क्र.१२५ या खाजगी जमिनीत जाण्यायेण्याकरिता पोहोचरस्ता तयार करण्यासाठी नाल्याची जमीन मिळणेबाबत श्री. म्हात्रे यांची विनंती.

वाचन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्र.६२/-बी/कावि-४९७/९३, दिनांक २०.९.१९९३ रोजीच्या पत्राच्या संदर्भात यांच्या विज्ञप्तीपूर्वक पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे. श्री. मदन म्हात्रे व इतर/मालकीच्या मौजे कांदिवली, येथील स.नं.१४६/२, न.भू.क्र.१२४ मधील २८ गुंठे ८ आणे व स.नं.१४७ न.भू.क्र.१२५ मधील १९ गुंठे असा एकूण १ एकर ७ गुंठे ८ आणे इतक्या जमिनीत जाण्यायेण्याकरिता पोच रस्त्यासाठी न.भू.क्र.१२८ धारा १२७/१ व १२७ या खाजगी जमिनीलगत असलेल्या नाल्याच्या उत्तरेकडील सुमारे १५० मीटर लांब व ८.००मीटर रुंद अशी १२०० चौ.मी. जमीन तेथील नाल्याच्या अरुंद भागात सुमारे [illegible]८० चौ.मी. क्षेत्रावर भरणी करून व त्याच्यासमोरील नाल्याच्या दक्षिणेकडील भागात नाल्यात नैसर्गिकरित्या झालेली भर काढून टाकून चालू बाजार भावाची अंदाजित किंमत प्रति चौ.मी.ला १०९० रु. इतकी मानून त्या किंमतीच्या १५% इतके वार्षिक भाडे आकारून १० वर्षांच्या कालावधीकरिता नेहमीच्या अटी/शर्तीवर तसेच पुढील अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

अटी:-

१] प्रस्तावित रस्त्यामुळे तसेच नाला भरणीमुळे नाल्याची रुंदी ५.५ मी पेक्षा कमी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

२] मंजूर जमिनीवर रस्ता तयार करण्यापूर्वी ज्या ठिकाणी नाल्याची रुंदी ५.५ मीटरपेक्षा कमी आहे, त्या ठिकाणची प्रस्तावित रस्त्याच्या विरुद्ध बाजूची नाल्यातील भरणी काढून टाकण्याचे काम जिल्हाधिकारी/मुंबई महानगरपालिका यांच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने प्रथम करावे.

३] प्रस्तावित रस्ता अर्जदारांना स्वखर्चाने तयार करावा लागेल व तो सर्वांना खुला ठेवावा लागेल. रस्त्याचे बांधकाम मुंबई महानगर पालिकेने ठरवून दिलेल्या दर्जाचे करावे लागेल व त्यास मुंबई

.....२/-

महानगरपालिकेची मंजुरी मिळवावी लागेल.

४) सदर रस्त्यावर लायसन्सी हक्क सांगणार नाही व मंजूर क्षेत्र/जमिनीचा कुठलाही भाग शासनास ज्यावेळी लागेल त्यावेळी त्या जमिनीचा कोणताही मोबदला न मागता शासनास परत करील असे हमीपत्र द्यावे लागेल.

५) लायसेन्सीकडून वसूल करण्यात येणारी सर्व रक्कम ही तात्पुरत्या स्वरूपाची असून, याबाबत शासन अंतिमरित्या ठरवेल ती लायसेन्स फी त्या फरकाची रक्कम जमिनीचा ताबा दिल्याच्या तारखेपासून विहीत व्याजदरासह शासनास भरणा करावी लागेल.

६) अर्जदारास मंजूर जमिनीचा तळपृष्ठ निर्देशांक (एफ.एस.आय.) व टी.डी.आर. मिळणार नाही. व अर्जदार त्याची मागणी करणार नाही.

७) जिल्हाधिकारी यांना याबाबत योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती

वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी मुद्रांकित हमीपत्र जिल्हाधिकारी यांनी संबंधिताकडून घ्यावे.

२. हे आदेश नगर विकास विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या ठराव क्र. विअप्र-१०२२/प्र.क्र.१४८/९९/विनियम, दिनांक ०१.८.१९९९ अन्वये या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय. आल्हाट)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एम. आर. डी. ए. इमारत,
वान्द्रे(पू) मुंबई-४०००५१

प्रतिलिपी:-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) उपसंचालक, भूमी अभिलेख, नवी मुंबई.
३) सहायक संचालक, नगररचना, नवी मुंबई
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५) महालेखापाल, मुंबई
६) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) कार्यासन ज-३ का. महसूल व वन विभाग (निवडनस्ती)

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.26556799, 26557807 Fax : 26556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :-६२/३ डी/एल-५९१
दिनांक :- /४/२००७
५/५/२००८

प्रति,

१) तहसिलदार ,बोरीवली
२) नगर भूमापन अधिकारी
बोरीवली

विषय :- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कांदिवली, येथील स.न. १४६/२ न.भू.क्र. १२४ व स.नं. १४७ न.भू.क्र. १२५ या खाजगी जमीनीत जाण्यायेण्याकरीता पोहोच रस्ता तयार करण्यांसाठी नाल्याची जमीन मिळणेची श्री. मदन म्हात्रे यांची विनंती.

शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दि. १९/१२/९४ अन्वये श्री. मदन म्हात्रे यांना त्यांच्या विषयांकित खाजगी जमीनीवर जाण्यासाठी पोहोच रस्त्यासाठी न.भू.क्र. १२८पै. १२७/१ व १२७ या खाजगी जमीनी लगतच्या नालयापैकी नाल्याच्या उतरेकडील सुमारे १५० मीटर लांब व ८.०० मी. रुंद अशी १२०० चौ. मी. जमीन येथील नाल्याच्या अरुंद भागात सुमारे १८३.६० चौ. मी. क्षेत्रावर भरणी करुन व त्याच्या समोरील नाल्याच्या दक्षिणेकडील भागात नाल्यात नैसर्गिकरित्या झालेली भर काढून टाकून १० वर्षाचे भाडेपट्टयाने मंजुर करण्यांस मंजुरी देण्यांत आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जमीनीची मागणी फार जुनी आहे. त्यामुळे अर्जदार यांनी जागेवर रस्ता बनविला असल्याची शक्यता असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन जागेची पाहणी करुन जागेवर रस्ता तयार केला आहे. किंवा कसे तसेच पुर्वी प्रस्तावित केल्याप्रमाणे आजही रस्ता बनविण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर जमीन उपलब्ध आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत या कार्यालयाचे पत्र समक्रमांक दि. २३/७/१९९७ अन्वये आपणांस कळविण्यांत आले होते. ( सोबत प्रत)

प्रकरणी जवळपास १० वर्षाचा कालावधी लोटला असून आतापर्यंत आपलेकडील अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

शासनाचे आदेश १९९४ साली प्राप्त झाले असून जमीन १० वर्षाचे भाडेपट्टयाने देण्यांस मान्यता देण्यांत आली होती. परंतु प्रस्तुत प्रकरणी कोणतयाही प्रकारची कार्यवाही झालेचे संचिकेवरुन दिसुन येत नाही. जर प्रसतुत जमिनीचा वापर अर्जदार यांचेकडून करण्यांत येत असेल तर त्यांचेकडून भाडेपट्टयाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त विषयाबाबतचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

स्थळ प्रतीवर
उप जिल्हाधिकारी (सा. प्र.)
यांनी सही असे

उप-जिल्हाधिकारी (सा.प्र.)
मुंबई उपनगर जिल्हा. करिता



Scanned by CamScanner

क्रमांक : नभूअ बोरिवली / कांदिवली

न.भू.क्र. १२८, १२५ पोहोच रस्ता / ०५

नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे कार्यालय
तहसिलदार व नगर भूमापन कार्यालय इमारत
चौथा मजला, डॉ. न. र. फाटक मार्ग (नाटकवाला लेन)
एस. व्ही. रोड, बोरिवली (प.), मुंबई-४०० ०९२

बोरिवली दिनांक २९/०५/२००५

प्रति

मा. जिल्हाधिकारी

मुंबई उपनगर जिल्हा

विषय - जमिन मुंबई उपनगर जिल्हा मौजे कांदिवली येथील स.नं. १७५२(?), न.भू.क्रमांक १२८, व स.नं. १२७(?), न.भू.क्रमांक १२८(?) या खाजगी जमिनीतून जाण्या-येण्याकरीता पोहोच रस्ता तयार करण्यासाठी नाल्याची जमिन मिळणेबाबत श्री मदन म्हात्रे यांची विनंती

संदर्भ - आपलेकडील पत्र क्रमांक ५१ [illegible], १०५५(?) दिनांक ५/५/२००५

[illegible stamp] २३ 12660

WS-142

आपले उपरोक्त संदर्भीत पत्रानुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

शासन महसूल व वनविभागाकडील शासन दिनांक १५/१/०८(?) अन्वये श्री मदन म्हात्रे यांना त्यांच्या विकसीत(?) खाजगी जमिनीवर जाण्यासाठी पोहोच रस्त्यासाठी न.भू.क्र.१२८, १२५/१ व १२८(?) या खाजगी जमिनी लगतच्या नाल्यापैकी, नाल्याच्या उत्तर-कडील सुमारे १५ मिटर लांब व ६.० मिटर रुंद अशी १२०(?) चौमी. जमिन येथील नाल्याच्या मधील(?) भागात सुमारे १६३.६० चौमी. क्षेत्रावर भरणी करून व त्याच्या बाजुकडील नाल्याच्या दक्षिणेकडील भागात नाल्यात नैसर्गिक रित्या झालेले भर काढून टाकून

Scanned by CamScanner

१० वर्षाचे भाडेपट्ट्याने मंजूर करण्याची मंजुरी देण्यांत आल्याचे दिसून येते

सदर पोहोच रस्त्याच्या जागेबाबत मा. जिल्हाधिकारीकडील सरकारी मो.र.नं. ५०/८३ दिनांक ३/५/८३ रोजी मोजणी करण्यांत आली आहे. तसेच या कार्यालयाकडील पत्र क्रमांक न.भू./कांदिवली न.भू. क्रमांक १५४, १५५/८३ दिनांक २०/०९/८३ ने कागदपत्रे अहवाल सादर करणेत आला आहे. तरी आपलेकडील उपरोक्त संदर्भीत दिनांक ५/५/२००८ चे पत्रानुसार या कार्यालयाकडील परिरक्षण भूमापक यांनी दिनांक ८/५/२००८ रोजी सदर जागेची पहाणी केली असता न.भू.क्र. १२८, १२७/१ व १२८ या मिळकती रेकॉर्डातले नकाशाने भागामध्ये नकाशाने भरणी केल्याचे अथवा पोहोच रस्ता तयार केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे प्रस्तुत जमिनीला वापर अर्जदार यांनेकडून होत नसल्याचे दिसते. त्याच्या पुढील जरूरती कार्यवाही होणेस नम्र विनंती आहे. सोबत स्थळदर्शक नकाशा सादर केला आहे.

मा. विनंती सादर

(स्वाक्षरी)
नगर भूमापन अधिकारी
बोरीवली २१/५/०८

Scanned by CamScanner